| MHSN060000162020 | **नियमित दिवाणी दावा : २/२०२०**<br>श्री. सिकंदर बैरागदार वि.<br>श्री. शौकत वस्ताद वगैरे |
|---|---|

## निशाणी क्र. ५८ वरील आदेश

**१.** वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे की, दि.१३/११/२०१९ रोजीचे नि.३/७ कडील अस्सल खरेदीपत्र हे प्रतिवादीचे ताब्यात असून ते मे. कोर्टासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्जाद्वारे वादी यांनी प्रतिवादी यांना सदरील अस्सल खरेदीपत्र हजर करणेकामी आदेशित करावे अशी विनंती केली आहे.

**२.** प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीचा अर्ज नाकारलेला आहे. त्यांच्या कथनानुसार वादी यांनी वेळ काढण्याकरिता सदरचा खोटा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी हे वादीचा उलटतपास घेण्याकरिता तयार आहेत. तसेच यातील वादी यांनी दावेसोबत मूळ खरेदीपत्र हजर केलेले नाही. त्यामुळे वादी हे प्रतिवादी यांना नि.३/७ कडील खरेदीपत्र हजर करणेबाबत सक्ती करु शकत नाही. वादी हे पुराव्याच्या अनुषंगिक इतर बाबींची पुर्तता करु शकतात. त्याकरिता काम लांबणीवर टाकण्याची गरज नाही. तरी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा तसेच उलटतपासाकरिता वादी यांना ताबडतोब हजर राहणेबाबत आदेशित करणेत यावी अशी त्यांनी विनंती केली.

**३.** अर्ज वाचला. अर्जाचे, प्रकरणाचे व दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी हा प्रतिवादी यांचेकडून वर उल्लेख केल्याप्रमाणे दस्ताची मागणी करीत आहे. प्रतिवादी यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या पुराव्याच्या वेळी ते प्रस्तुतचे खरेदीपत्र हजर करणार आहेत. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

### आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी त्यांच्या पुराव्याच्या वेळी किंवा त्यापूर्वी सदरचे दि.१३/११/२०१९ रोजीचे अस्सल खरेदीपत्र हजर करावे.

मिरज

दिनांक : ११/१२/२०२३

**(नि. बा. चव्हाण)**

४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj |
| Date. | : | 11.12.2023. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 11.12.2023. |
| Order uploaded on. | : | 11.12.2023 |